पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले रुग्णालय,
चिंचवड, पुणे – ३३.
जा. क्र. शक्षदुके/कावि/939 /२०२२.
दिनांक -20 /०५/२०२२.

प्रति,
मा.मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**विषय- जाहिरात प्रसिध्दी बाबत.**
**संदर्भ-** मा.आयुक्त यांचेकडील दि.०५/०३/२०२२ रोजीचा मान्य प्रस्ताव.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय प्रस्तावान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत एस टी एस, टी बी हेल्थ व्हिजीटर या संवर्गातील रिक्त पदे भरण्यास मान्याता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने जाहिरात मसुदा व उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना सोबत हार्ड कॉपी व सॉप्ट कॉपी मध्ये देण्यात येत असून सदर जाहिरात मसुदा व उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दि.२५०५/२०२२ पुर्वी प्रसिध्द करण्यात यावा हि विनंती.

कळावे,

आपला विश्वासु,

वैद्यकिय संचालक
तथा
अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

सोबत- जाहिरात मसुदा व अर्जाचा नमुना.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ एॅण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम (NTEP) साठी एकत्रित मानधनावर कंत्राटी पद्धतीने खालील पदे भरावयाची आहेत .याकामी खालीलप्रमाणे नमुद केलेल्यापदांकरिता शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत .

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्य | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन र.रु. | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक | ०१ | १) शासन मान्यता प्राप्त विद्यापीठा कडील कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण<br>२) शासन मान्यताप्राप्त संस्थेची मराठी ३० व इंग्रजी ४० प्रति मिनिट टायपिंग आणि एम एस सी आय टी उत्तीर्ण<br>३) १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | २०,०००/- | खुला-१ |
| २ | टि. बी. हेल्थ व्हिजीटर | ०२ | १) एम.एस.डब्ल्यु कोर्स उत्तीर्ण<br>२) १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | १५,५००/- | इ.मा.व. -१<br>ई. डब्ल्यु. एस. १ |

<u>अटी व शर्ती-</u>

१) इच्छुक उमेदवारांची अर्ज स्विकृती व थेट मुलाखती खालील वेळापत्रका नुसार प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड या ठिकाणी आयोजित केलेल्या असुन उमेदवाराने विहित वेळेत उपस्थित राहणे आवश्यक आहे.

| पदाचेनाव | मुलाखतीचा दिनांक | अर्ज स्विकारण्याची वेळ |
|---|---|---|
| वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक | दि. ०७/०६/२०२२ | सकाळी - १० ते ११ |
| टि. बी. हेल्थ व्हिजीटर | | |

२) इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करताना अर्जासोबत १) वयाचा पुरावा २) पदवी/पदवीका प्रमाणपत्र ३) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका ४)रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र ५) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र (यामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये काम केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल). ६) निवासी पुरावा ७) जातीचे प्रमाणपत्र ८) उमेदवाराचा सद्याचा पासपोर्ट साईजचा फोटो, स्वाक्षरी (नमूद केलेल्या आकारमानामध्ये) पिंपरी चिंचवड महानगरपालिका संकेतस्थळ www.pcmcindia.gov.in वरील भरती या सदरा मध्ये जाऊन अर्जाची प्रिंट काढून सदरचा अर्ज भरुन मुलाखतीस उमेदवाराने स्वत: उपस्थित रहावयाचे आहे.

३) सदरची पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने प्रकल्पासाठी भरावयाची असुन सदर पदावरील उमेदवारांना प्रथम नियुक्ती ११ महिने कालावधीची देण्यात येईल व शासनाकडून याबाबत प्राप्त मार्गदर्शक सूचना लागू राहतील. तसेच सदरचा प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.

४) सदरची नियुक्ती पुर्णपणे तात्पुरत्या (हंगामी) स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कायमपदी नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही ज्या दिवशी सोसायटीस सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशीशिवाय मानधनावरील सेवा समाप्त केली जाईल.

५) सदर पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना मानधना बाबत शासनाकडून वेळेवेळी प्राप्त सुचना लागू राहतील.

६) मा.आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचेकडील दि. २९/०९/२०१८ अन्वये सदर पदासांठी उमेदवारांची सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील. तसेच सेवानिवृत्त उमेदवारांसाठी ६५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल राहील परंतु वय वर्ष ६० नंतर जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

७) जर या आधी उमेदवाराने राष्ट्रीय आरोग्य अभियान मध्ये काम केले असेल तर वयोमर्यादे मध्ये ५ वर्षे शिथिल करण्यात येईल.

८) मुलाखत एकास पाच (१:५) या प्रमाणे उमेदवारांना मुलाखतीस बोलवण्यात येईल. याकरिता उपरोक्त नमुद करणेत आलेल्या मुलाखतीच्या वेळापत्रकामधील दिनांकास पहिल्या १ तासामध्ये म्हणजे सकाळी १० ते ११ या वेळेत जेवढे उमेदवार उपस्थित असतील अशा उमेदवारांची हजेरी नोंदवून व त्यांचेकडून विहित नमुन्यातील अर्ज व कागदपत्रे घेण्यात येतील.त्यानंतर उपस्थित असलेल्या उमेदवारांची मुलाखतीसाठी नोंदणी करणेत येणार नाही व याबाबतचा अंतिम निर्णय सदस्य सचिव तथा वैद्यकिय संचालक, पिं.चिं.म.न.पा. यांचा राहील.

९) मुलाखतीला जास्त उमेदवार आल्यास छाननीअंती एका पदास पाच उमेदवार या प्रमाणे पदानुसार शैक्षणीक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेतीलप्राप्त गुण व अनुभवाचे गुण यांचे अधारे गुणांचा कट ऑफ लावुन त्यानुसार मुलाखती घेण्यात येतील.

१०) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणत्याही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

११) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदाचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरिता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये नमुद करावा.

१२) उपरोक्त नमुद पदासाठीच्या सर्व सूचना, पात्र/अपात्र यादी, निवड/प्रतिक्षा यादी, हरकती स्विकारणे या बाबतची माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिका संकेतस्थळ www.pcmcindia.gov.in वर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. तथापी, याबाबत उमेदवारास कोणतीही वेगळी सूचना अथवा दूरध्वनी,

एस.एम.एस.,ई-मेल केला जाणार नाही याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्यामुळे उमेदवाराने वेळेवेळी संकेत स्थळास भेट देणे अनिवार्य राहील.

१३) पदभरतीचे अर्ज उपरोक्त नमूद मुलाखतीच्या ठिकाणी दिलेल्या वेळापत्रकानुसार घेण्यात येणार असल्याने कोणत्याही उमेदवाराने कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवु नये, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका, वैद्यकीय विभाग येथे कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१४) उमेदवारांनी अर्ज सादर करताना त्यांचा सध्या सुरू असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचुक नोंदवावा. तसेच भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कार्यान्वीत राहील याची दक्षता घ्यावी.

१५) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर सदर उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती कोणतीही पुर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.

१६) सदर पदांचे संख्येमध्ये अथवा आरक्षणामध्ये बदल, सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगीत करणे तसेच निवड / नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१७) मुलाखत (परिक्षा) एकुण १०० गुणांची राहील.

या मध्ये जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अर्हतेच्या शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार जास्तीत जास्त ५० गुण देण्यात येतील.

अ) उमेदवाराचे पात्र शिक्षणाच्या शेवटच्या वर्षाचे गुण ग्राहय धरले जातील.

ब) उमेदवारास ५० गुण पुढील प्रमाणे देय राहतील- कौशल्य चाचणी-१० गुण,
विषय ज्ञान- १० गुण, अनुभव- १० गुण ( प्रत्येक वर्ष ०२ गुण) व तोंडी मुलाखत- २० गुण

१८) मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांनी सर्व आवश्यक मुळ कागदपत्रांसह स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित रहावे. त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय नाही.

१९) शासकिय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्ती पूर्वी मिळत असलेले वेतन वजा निवृत्ती वेतन अशी जी रक्कम येईल ती मानधन म्हणुन देण्यात येईल.

२०) सदर पदभरती अंतर्गत निवड करण्यात येणा-या उमेदवारांना सदरचे पदावर कायमस्वरुपी हक्क सांगणार नसलेबाबत र.रु.१०० चे स्टॅम्प पेपरवर बंधपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

०१/०३/२२

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

## उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना

प्रति,

मा. आयुक्त.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे ४११ ०१८

| फोटो |
|---|
| |

विषय –........................................... या पदासाठी अर्ज
संदर्भ - दि.    -    -२०२२ रोजीची जाहिरात

महोदय,

उपरोक्त संदर्भिय जाहिरातीनुसार मी राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत कंत्राटी पध्दतीने मानधनावरील ................................या पदासाठी आवश्यक ती अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे:

| अ.क्र. | तपशील | माहिती | | |
|---|---|---|---|---|
| १ | संपुर्ण नाव | आडनाव | नाव | वडील / पतीचे नाव |
| २ | पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता | | | |
| ३ | ई-मेल | | मोबाईल क्र. | |
| ४ | जन्मतारीख | | | |
| ५ | लिंग | पुरुष | स्त्री | |
| ६ | सद्यस्थितीत महापालिकेत कामकाज करीत आहे काय | होय / नाही | | |
| | होय असल्यास | दवाखान्याचे नाव - | पदनाम - | |
| ७ | जात - | जातीचा प्रवर्ग - | | |

| SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | OBC | SBC | EWS | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

९ शैक्षणिक अर्हतेचा तपशील

| शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

१० तांत्रिक व इतर अर्हता तपशील

| अ.क्र. | संस्थेचे नाव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

सदरची पदे ही तात्पुरत्या / हंगामी स्वरुपातील नेमणुकीची असून ११ महिन्यांकरीताच्या नेमणुकीची आहेत याची मला जाणीव असून याबाबत मी भविष्यात कोठेही व कोणताही दावा दाखल करणार नाही. वरीलप्रमाणे नमूद केलेली सर्व माहिती, तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी / चूकीची अथवा अपुरी असल्याचे आढळून आल्यास नेमणुकीच्या कोणत्याही टप्प्यावर या माहितीच्याआधारे महापालिका सेवेतून कमी करण्यास तसेच या भरतीकरीताच्या अपात्रतेस मी स्वत: जबाबदार राहिल. याबाबत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई देखील केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

अर्जदाराची सही -

स्थळ -

अर्जदाराचे नाव ----------------------------

दि.    /    /२०२२

**सहपत्रे-** अर्जा सोबत खालील प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

१) शैक्षणिक व इतर अर्हतेची प्रमाणपत्रे    २) जन्मतारखेचा पुरावा    ३)अनुभवाची प्रमाणपत्रे    ४) जात प्रमाणपत्र

५) रहिवास पुरावा    ६) इतर कागदपत्रे.